PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Chinu
Year: 2012

Song: Daatlel Dhuk
Lyricist:

जळाली गं फुलोऱ्यात
सारी माझी सुखं
जळाली गं फुलोऱ्यात
सारी माझी सुखं
पापणीच्या काठावर
दाटलेलं धुकं
दाटलेलं धुकं
हो जळाली गं फुलोऱ्यात
सारी माझी सुखं
पापणीच्या काठावर
दाटलेलं धुकं
दाटलेलं धुकं

दिशा अंधारून आल्या
सापडेना वाट
दिशा अंधारून आल्या
सापडेना वाट
नियतीचा खेळ
माझ्या दिला ओंजळीत
निखाऱ्यात पाय ज्याचे
त्याचं मन मुकं
निखाऱ्यात पाय ज्याचे
त्याचं मन मुकं
पापणीच्या काठावर
दाटलेलं धुकं
दाटलेलं धुकं

कशी हरवली माझी
सावली सुखाची
कशी हरवली माझी
सावली सुखाची
काळजाची गाठ कोणी
बांधली दुःखाची
शोधायला गेलो काही
हाती आली राख
शोधायला गेलो काही
हाती आली राख
पापणीच्या काठावर
दाटलेलं धुकं
दाटलेलं धुकं
हो जळाली गं फुलोऱ्यात
सारी माझी सुखं
पापणीच्या काठावर
दाटलेलं धुकं
दाटलेलं धुकं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*